**जनसंपर्क अधिकारी**

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेस नोट क्र. १७५** **दिनांक ०२/०७/२०२१**

## कोकेन व गांजा अंमली पदार्थ विक्री करणा-या ३ नायजेरीयन आरोपींवर कारवाई, अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांची कामगिरी.

दिनांक २९/०६/२०२१ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती प्राप्त झाली की, 'हाटकेश येथील मंगलनगर भाजी मार्केटचे शेजारी असलेल्या कृष्णा बिल्डींग मधील फ्लॅट क्र. ३०२ मध्ये काही नायजेरीनयन नागरीक हे कोकेन नावाचा अंमली पदार्थ स्वत:चे कब्ज्यात बाळगुन विक्री करीत आहे.' सदरची मिळालेली बातमी डॉ. श्री. महेश पाटील पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांना कळवून त्यांचे सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे श्री. रामचंद्र देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे नेतृत्वात छापा कारवाई करण्यात आली. सदर कारवाईचे दरम्यान १०० ग्रॅम कोकेन व ६५५ ग्रॅम गांजा नावाचा अंमली पदार्थ नायजेरीयन आरोपींचे कब्ज्यात मिळुन आला. त्याचप्रमाणे सदरच्या कारवाई दरम्यान फ्लॅट क्र. ३०३ येथे ९४१०/-रु. किंमतीचा अवैधरित्या केलेला मदयसाठा मिळुन आला आहे. मिळुन आलेल्या कोकेनची किंमत आंतरराष्ट्रीय बाजारात २५,००,०००/-रु. अशी आहे. सदरचे मिळून आलेले अंमली पदार्थ जप्त करण्यात आले असुन ३ नायजेरीयन आरोपींविरुध्द काशिमीरा पोलीस ठाणे येथे गुरनं. ॥ ४६२/२०२१ अंमली पदार्थ कायदयापमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा पुढिल तपास पोनि. विजय पवार काशिमिरा पोलीस स्टेशन हे करीत आहे.

सदरची कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. श्री. जितेंद्र वनकोटी, पोनि. श्री. देवीदास हंडोरे, सहा. पोलीस निरीक्षक बेंद्रे, पोहवा.२१८८. धनाजी इंगळे, पोना.२५४. पवन पाटील, पोशि. १२०४ विष्णुदेव घरबुडे, मपोशि. १३४ प्रतिभा जाधव, पो.ना. ३१९५ विनोद राउत, पो.शि. ३३७५ राजेश श्रीवास्तव नेमणुक गुन्हे शाखा, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांनी केली आहे.

-----oooo-----